संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

हा सायबर दहशतवादच ठरतो

दरवर्षी ऑक्टोबर महिना हा सायबर गुन्हेगारीविरोधी महिना म्हणून पाळायला सुरुवात झाली. भारतात २०२४पासून हाच महिना सायबर गुन्हेगारीविषयी जनजागरण करणारा महिना निश्चित केला गेला. एखाद्या विशिष्ट गुन्हेगारी प्रकाराविरुद्ध लोकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी संपूर्ण महिना राखून ठेवण्याचा किंवा संपूर्ण महिनाभर जनजागरण करण्याचा हा जगातला आणि भारतातला पहिला प्रकार ठरतो. एरवी जगभरामध्ये अगदी हत्या, खून, दरोडे इथपासून ते बलात्कारापर्यंत गुन्ह्यांचे थैमान पाहायला मिळते. या सगळ्या गुन्ह्यांविरुद्ध जनजागृती किंवा लोकप्रबोधन करण्यासाठी कधी प्रयत्न केला गेला नाही. फक्त वाहतुकीचे नियम पाळले जावेत. कमीत कमी अपघात व्हावेत या एका उद्देशाकरीता सात दिवसांची रस्ते सुरक्षा मोहीम दरवर्षी राबवली जाते. परंतु ज्याअर्थी अमेरिकेसारखी महासत्ताही सायबर गुन्हेगारीला पूर्णपणे थांबवू शकलेली नाही आणि हे प्रकार रोखण्याकरीता व्यापक जनजागृती आवश्यक आहे. याची तीव्रता अमेरिकेसारख्या देशाला जाणवलेली दिसते. यावरून सायबर गुन्हेगारीचे धोके आणि गांभीर्य किती मोठे आहे हेसुद्धा स्पष्ट होते. रोज बदलणारे तंत्रज्ञान म्हणजे सायबर गुन्हेगारांना मिळणारे एक नवे शस्त्र ठरते आहे. म्हणजे सगळ्या जगासाठी तंत्रज्ञान हे वरदान मानले जात असले तर सायबर गुन्हेगारांना ते शस्त्र प्रदान करणारे ठरले आहे. हे गुन्हे इतक्या विविध स्वरूपाचे आहेत. तंत्रज्ञानातले कौशल्य वापरून हा सायबर गुन्हेगार केव्हा आपली तिजोरी साफ करेल याचा नेम राहिलेला नाही. बिनचेहऱ्याची पण भरपूर कमाई देणारी ही सायबर गुन्हेगारी जगातल्या सगळ्याच पोलीस किंवा सुरक्षा यंत्रणांपुढे एक मोठे आव्हान ठरते आहे. भारतालादेखील गेल्या वीस वर्षामध्ये त्याची मोठी झळ पोहोचली. म्हणून २०१३ ला भारतात या गुन्हेगारीविरुद्ध स्वतंत्र कायदा केला गेला. परंतु नुसते कायदा करणे पुरेसे ठरलेले नाही.

भारतातून मुबलक कमाई

भारतासारखा सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश या सायबर गुन्ह्यांसाठी मुबलक कमाई करून देणारा देश ठरला आहे. कारण भारतात अजून पुरेशी तंत्रसाक्षरता आलेली नाही. केवळ मोबाईल वापरता येतो याचा अर्थ मोबाईलमध्ये असलेल्या अनेक गोष्टींबाबत तांत्रिक माहिती सगळ्यांनाच असते असे नाही. भारतात आज १२० कोटी लोकांकडे मोबाईल आहे त्यापैकी ७५ ते ८० टक्के लोकांना मोबाईलसंदर्भातही पुरेशी माहिती नसते. म्हणूनच वेगवेगळ्या ॲप्सचा वापर करून हे सायबर गुन्हे किंवा सायबर फ्रॉड सहजपणे घडून येत आहेत. डिजिटल अरेस्टसारख्या प्रकाराने तर चांगलेच थैमान घातले. केवळ मोबाईलवरच्या संवादातून समोरच्या व्यक्तीला घाबरवण्याचे काम त्याच्याकडून त्याच्या बँकेचेही तपशील मागवण्याचा उद्देश या डिजिटल अरेस्ट प्रकारातून झाला. २०२४ या एका वर्षात भारतात सायबर गुन्हेगारीच्या तब्बल ३६ लाख तक्रारी नोंदल्या गेल्या. आणि जवळपास २३ हजार कोटींची फसवणूक करण्याचा धक्कादायक प्रकार घडून आला. यातली आश्चर्याची गोष्ट म्हणजे सायबर गुन्हेगारीचा वेग भारतात दोनशेपट आहे. हे ऐकून कोणालाही धक्का बसू शकतो. कारण २०२३मध्ये साडेसात हजार कोटींची सायबर फसवणूक करण्याचा प्रकार घडला होता. आणि चोवीस लाख तक्रारी नोंदल्या गेल्या होत्या. यावरून या गुन्हेगारीची वाढ वर्षभरात तब्बल २०६ टक्क्यांनी झाली. जर याच पद्धतीने सायबर गुन्हेगारीचा हा दरोडा असाच सुरू राहिला तर तो केवळ पैशांचीच लूट करणारा ठरत नाही तर तो दहशतवादाचा नवा अवतारच म्हटला पाहिजे. यातून देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठा धोका पोहोचतो आहे. भविष्यकाळामध्ये अनेक आर्थिक व्यवहार किंवा अर्थचक्र अस्थिर करण्याचाही प्रकार घडून येऊ शकतो. सरकारने यासंदर्भात सुरू केलेली उपाययोजना पुरेशी ठरलेली नाही हे वरील आकडेवारीवरून सिद्ध होते. यासंदर्भातले गुन्हे शोधून काढणे हे एकट्या पोलीस यंत्रणेचे काम राहिलेले नाही यासाठी नागरिकांचा मोठा सहभाग गरजेचा ठरतो. शिवाय तंत्रज्ञानात कौशल्य असलेल्या व्यक्ती आणि खासगी कंपन्यांची मदत घेऊन हे गुन्हे रोखावे लागतील.

गुन्ह्यांमध्ये २०६ टक्के वाढ

केंद्र सरकारने आज भलेही यासंदर्भातली संयुक्त मोहीम सुरू केली असली आणि केंद्र आणि राज्य सरकारच्या मदतीने सायबर क्राईम को-ऑर्डिनेशन सेंटर जरी सुरू झाले असले तरीदेखील भारतासारख्या देशात खेड्यापाड्यापर्यंत याबद्दलची जनजागृती आवश्यक झालेली आहे. अगदी हवाला रॅकेटपासून ते सामान्य माणसाच्या डेबिट-क्रेडीट कार्डपर्यंतची माहिती मिळवण्यात हे गुन्हेगार यशस्वी ठरतात. मोठमोठ्या कंपन्यांचा डेटा चोरतात. त्याच्या मोबदल्यात खंडणी मागतात. जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात बसून हे सायबर हॅकर्स मोठमोठ्या संस्थांनासुद्धा धोका पोहोचवू शकतात. दोन दिवसापूर्वीच अंमलबजावणी संचालनालयाने देशभरातल्या या सायबर फ्रॉड करणाऱ्या कंपन्यांवर धाड घातली आणि जवळपास साडेआठ हजार कोटीची रक्कम परत मिळवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. गेल्या वर्षभरात असे फ्रॉड करणाऱ्यांचे साडेनऊ लाख सीमकार्डस ब्लॉक केले गेले. याशिवाय आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या काही लिंक्स शोधून त्यातले नंबरही ब्लॉक केलेले आहेत. देशभरातल्या बँकांची आणि आर्थिक संस्थांची मदत घेऊन असा व्यवहार करणाऱ्या जवळपास अकरा लाख संशयितांची माहिती गोळा केली गेलेली आहे. आणि चोवीस लाख बँकखातीसुद्धा शोधून काढली गेली आहेत. यासंदर्भात आतापर्यंत साडेदहा हजार लोकांना अटक झाली आहे म्हणजे सायबर गुन्हेगारीची व्यापकता किती प्रचंड आहे हे त्यातून दिसते. म्हणूनच सायबर गुन्हेगारीचा हा महाराक्षस वेळीच रोखला गेला पाहिजे. तरच त्याची दहशत थांबवता येईल.

सुविचार

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

उपकार जरी नाही फेडता आले तरी चालतील,
पण जाणीव कायम बाळगावी.

पंचांग

शनिवार, ४ ऑक्टोबर २०२५
शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर



आश्विन शुक्ल द्वादशी
नक्षत्र : धनीष्ठा

रवी उदय- ०६-३१
रवी अस्त- १८-२३

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० कुंभ

शनिप्रदोष; क्षीरदानद्विदल व्रत; फत्तेयाजादहम

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता १) दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८. २) एलिगंट ऑफसेट प्रिंटर्स प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं.एफ ७-१ आणि एफ ७-२/२, एमआयडीसी, शिरोली इंडस्ट्रीयल एरीया, शिरोली गाव, ता.हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर - ४१६१२२ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** ● कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) ● सल्लागार संपादकः **तुळशीदास भोईटे**

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at 1) Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. . 2) Elegant Offset Pvt. Ltd., Address : Plot No.F7-1 & F7-2/2, M.I.D.C., Shiroli Industrial Area, Village Shiroli, Tal. Hatkanagle, Dist Kolhapur-416122. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** ● Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal) ● Consulting Editor - **Tulsidas Bhoite**

वेस्ट इंडिजवर भारताची २८३ धावांची आघाडी

राहुल, जुरेल आणि जडेजाची शतकी खेळी

■ अहमदाबाद

नरेंद्र मोदी क्रिकेट स्टेडियमवर सुरू असलेल्या दोन कसोटी मालिकेच्या पहिल्या सामन्याच्या दुसऱ्या दिवशी आज पहिल्याच डावात भारतीय संघाने वेस्ट इंडिजवर २८६ धावांची आघाडी घेतली आहे. त्यामुळे आता पहिल्या डावात १६२ धावा करणारा वेस्ट इंडिजचा संघ पराभवाच्या छायेत आला. के.एल, राहुल, ध्रुव जुरेल आणि रविंद्र जडेजा यांच्या शतकी खेळीच्या जोरावर भारताने दिवसअखेर ५ बाद ४४८ धावा केल्या. काल पहिल्या दिवसअखेर भारताने ३८ षटकांत २ बाद १२१ धावा केल्या होत्या. त्यावेळी के.एल. राहूल ५३ आणि शुभमन गिल १८ धावांवर खेळत होता. त्यांनी आज भारताचा डाव पुढे नेण्याचा प्रयत्न केला. मात्र गिल ५ चौकारांसह ५० धावा करुन झेलबाद झाला. त्यानंतर के.एल, राहूलला साथ देण्यासाठी ध्रुव जुरेल मैदानावर उतरला. मात्र संघाची धावसंख्या २१८ धावांवर पोहोचताच राहूल शतक ठोकून माघारी परतला. मग ध्रुव जुरेल आणि रविंद्र जडेजा यांची जोडी जमली आणि त्यांच्या खेळीसमोर वेस्ट इंडिजचे गोलंदाज चांगली हतबल दिसले. त्यांनी पाचव्या विकेटसाठी २१० धावांची भागिदारी केली. त्यानंतर ध्रुव जुरेल १२५ धावा करुन झेलबाद झाला. त्याने आपल्या खेळीत ३ षटकार आणि १५ चौकार ठोकले. तो बाद झाल्यानंतर जडेजानेही आपले शतक पूर्ण केले. दिवसअखेर जडेजा १०४ धावा आणि वॉशिंग्टन सुंदर ९ धावा करुन नाबाद तंबूत परतले. त्यावेळी भारताची स्थिती ५ बाद ४४८ धावा होती. वेस्ट इंडिजकडून रोस्टन चेसने दोन बळी घेतले, तर जेडेन सील्स, जोमेल वॉरिकन आणि खॅरी पियरे यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

दादरमध्ये शालेय कॅरम स्पर्धेत उद्यापासून ८२ खेळाडूंमध्ये चुरस

मुंबई - आनंदराव अडसूळ चॅरीटेबल ट्रस्ट व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे दिवाळी सुट्टीत होणाऱ्या कोकण कप विनाशुल्क शालेय कॅरम स्पर्धेच्या निवड चाचणीच्या तिसऱ्या टप्प्यात ५ ऑक्टोबरपासून शालेय ८२ खेळाडूंमध्ये चुरस राहील. को-ऑपरेटीव्ह बँक एम्प्लॉईज युनियन व कोकण क्रीडा प्रबोधिनी सहकार्यात स्पर्धेचा उद्घाटनीय सामना विराज बर्वे विरुध्द समर्थ मोरे यामध्ये दादर-पश्चिम येथे रंगणार आहे. महात्मा गांधी विद्यामंदिरची राष्ट्रीय सबज्युनियर कॅरमपटू तनया दळवी, शिर्के हायस्कूल-रत्नागिरीची स्वरा मोहिरे, इंग्लिश स्कूल-जैतापूरचा आर्यन राऊत, पोद्दार अकॅडमी-मालाडचे प्रसन्न व पुष्कर गोळे, आयईएस सुळे गुरुजी शाळेची ग्रीष्मा धामणकर, पार्ले टिळक विद्यालयाचा अमेय जंगम, श्री नारायण गुरु हायस्कूल-चेंबूरचा उमेर पठाण, डॉ. अँटोनियो दासिल्वा आदी शालेय कॅरमपटूमध्ये विजेतेपदासाठी अटीतटीचे सामने होतील.

विदर्भाची इराणी चषकावर पकड मजबूत

नागपूर - इराणी कप क्रिकेट चषकाच्या एकमेव कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवसाअखेर आज विदर्भाने शेष भारतावर २२४ धावांची आघाडी घेतली. त्यामुळे या कसोटीवर विदर्भाने पकड मजबूत केली. विदर्भाने पहिल्या डावात ३४२ धावा केल्या होत्या. त्यानंतर शेष भारताला २१४ धावा करता आल्या. मग दिवसाअखेर विदर्भाने दुसर्या डावात २ बाद ९६ धावा केल्या. काल दुसऱ्या दिवसाअखेर शेष भारताने ५ बाद १४२ धावा केल्या होत्या.

मध्य रेल्वे

शुद्धीपत्रक

खुली निविदा सूचना क्र.: केडब्ल्यूएसी-आरएसपी-फोल्डेबल-बल्क-१, दि.: ११.०९.२०२५. कामाचे नावः कुर्ला वाडी कारखान्यांच्या जागेमध्ये १२ महिन्यांच्या कालावधीकरिता बीआरएन/बीआरएनए/बीआरएनएएचएस/बीआरएन २२.९ टी वॅगन्समध्ये फिक्स्ड बल्कहेडचे फोल्डेबल बल्कहेडमध्ये रुपांतरण. **अंदाजित किंमतः ₹ ७२,११,१३७.५७. निविदा अर्जाची किंमतः ₹ शुन्य. ईएमडीः ₹ १,४४,२००/-. पूर्तता कालावधीः १२ महिने.** वरील ई-निविदांच्या सादरीकरणाकरिता वेळ आणि दिनांक ०७.१०.२०२५ रोजी १३.०० वा. पर्यंत. ई-निविदेचे संपूर्ण तपशील अधिकृत रेल्वे वेबसाईट http://www.ireps.gov.in वर उपलब्ध आहेत. AK-514

तिकिटांकरिता यूटीएस ॲप डाऊनलोड करा

आर्टसन लिमिटेड
(पूर्वीची आर्टसन इंजिनियरिंग लिमिटेड)
सीआयएनः L27290MH1978PLC020644
नोंद. कार्यालयः १४ वा मजला, सिग्नस, प्लॉट क्र. ७१ए, कैलाश नगर, मयूर नगर पासपोली, घाटकोपर, मुंबई - ४०००८७
दूर.: ०२२-६६२५५६००; ईमेलः investors@artson.net; वेबसाईटः www.artson.net

भौतिक भागधारकांना सूचना

दि. १ एप्रिल २०१९ या अंतिम मुदतीपूर्वी दाखल केलेल्या आणि कागदपत्रांमधील त्रुटींमुळे नाकारलेल्या/परत केलेल्या भौतिक समभागांच्या हस्तांतरण विनंत्या पुन्हा दाखल करण्यासाठी सेबीने एक विशेष खिडकी उघडण्याची परवानगी दिली आहे.

मुख्य तपशीलः

पुन्हा दाखल करण्याकरिता खिडकी	**७ जुलै, २०२५ ते ६ जानेवारी, २०२६**	
हस्तांतरण विनंती कोण पुन्हा दाखल करू शकतो?	गुंतवणूकदार ज्यांचे हस्तांतरण करारनामे एप्रिल २०१९ पूर्वी दाखल केले होते आणि कागदपत्रांमधील त्रुटींमुळे नाकारले/परत करण्यात आले होते.	
हस्तांतरण विनंत्या कशा पुन्हा दाखल कराव्या?	सुधारित किंवा कमी असलेल्या तपशिलांसह मूळ हस्तांतरण दस्तऐवज निबंधक आणि भाग हस्तांतरण एजन्ट, एमयूएफजी इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीची लिंक इनटाईम प्रायव्हेट लिमिटेड)कडे सादर करावे.	
	टपाली पत्ता	सी-१०१, एम्बसी २४७, एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई - ४०००८३.
	हेल्पलाईन क्र.	+९१ ८१ ०८ ११ ६७ ६७
	कोणत्याही चौकशी करीता	https://web.in.mpms.mufg.com/helpdesk/service_Request.htmlयेथे सेवा विनंती पाठवा किंवा investors@artson.net येथे ईमेल पाठवा

जे समभाग हस्तांतरणाकरिता पुन्हा दाखल करण्यात आले आहेत ते फक्त डीमॅट स्वरुपात पारित करण्यात येतील

आर्टसन लिमिटेड करिता
सही/-
दीपक तिबरेवाल
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी (एफसीएस ८९२५)

दिनांकः ४ ऑक्टोबर, २०२५
ठिकाणः मुंबई

मध्य रेल्वे

मुंबई विभागात बांधकाम आणि दुरुस्तीचे काम

खुली ई-निविदा सूचना क्र.सीआर-जीएसयूसीएसएमटी-२०२५-७/३०.०९.२०२५

अ.क्र.१. कामाचे नावः तळोजा येथील गुड्स शेडसाठी ट्रॅकचे काम (सीटीआर १.० किमी आणि २ क्र.१ मध्ये ८.५ टर्नआउट काम). **अंदाजे मूल्यः** रु.८३.२४ लाख. **इरठेः** रु.१,६६,५००/-. **पूर्ततेचा कालावधीः** १२ महिने.

अ.क्र.२. कामाचे नावः लोणावळा स्टेशन (एनएसजी ३): प्रमुख अपग्रेडेशन टप्पा-१. **अंदाजे मूल्यः** रु.१४००.४३ लाख. **इरठेः** रु.८,५०,२००/-. **पूर्णतेचा कालावधीः** १८ महिने.

अ.क्र.३. कामाचे नावः पनवेल (एनएसजी १)- अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत पनवेल स्टेशन इमारत आणि परिभ्रमण क्षेत्राची सुधारणा. **अंदाजे मूल्यः** रु.१४५१.१३ लाख. **इरठेः** रु.८,५७,६००/-. **पूर्णतेचा कालावधीः** १८ महिने.

उपरोक्त निविदांची निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळः २४.१०.२०२५ रोजी ११:०० वा.पर्यंत आणि ११.०० वा. नंतर उघडली जाईल.

१) संभाव्य निविदाधारकांना निविदा आणि शुद्धीपत्रक, जर काही असेल तर, तपशिलांसाठी www.ireps.gov.in या वेबसाईटला भेट देण्याची विनंती आहे.

२) निविदाधारक वरील ई-निविदेत इलेक्ट्रॉनिक पद्धतीने www.ireps.gov.in या वेबसाइटद्वारे सहभागी होऊ शकतात आणि ई-निविदेविरुद्ध व्यक्तिचलित प्रस्ताव सादर करण्यास परवानगी नाही. व्यक्तिचलितपणे, जर सादर केले गेले तर ते उघडले जाणार नाहीत किंवा विचारात घेतले जाणार नाहीत.

३) बोली सुरक्षा ई-पेमेंट गेटवेद्वारे रोख स्वरूपात जमा केली जाईल किंवा भारतातील शेड्यूल्ड कमर्शियल बँकेकडून बँक गॅरंटी बाँड म्हणून सादर केली जाईल किंवा निविदा कागदपत्रांमध्ये नमूद केल्याप्रमाणे सादर केली जाईल.

४) अधिक चौकशीसाठी, संपर्क साधा: विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, गति शक्ती युनिट, तळमजला, मध्य रेल्वे यांच्याशी फोनवर - ०२२-६७४५३९२८.

५) ही निविदा जाहीर खरेदी धोरण आदेश २०१७ दिनांक १६.९.२०१७ चे पालन करते. निविदांची संपूर्ण माहिती www.ireps.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. AK-511

तिकिटांसाठी यूटीएस ॲप डाउनलोड करा

ई-लिलाव सूचना
नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अंतर्गत
एएमडब्ल्यू कमर्शियल व्हेईकल ॲप्लिकेशन्स लिमिटेड (परिसमापनामध्ये)
नोंद कार्यालयः कार्यालय क्र. ७, २रा मजला, रेडीमनी टेरेस, १६७, डॉ. ए. बी. रोड, वरळी मुंबई - ४०००१८.

नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या तरतुदींअंतर्गत
मालमत्तेची एकत्रितरित्या विक्री
लिलावाचा दिनांक आणि वेळः गुरुवार, दि. ६ नोव्हेंबर, २०२५, दु. १२ ते २ वाजेपर्यंत
(प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)

नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ आणि त्याअंतर्गत असलेल्या नियमांअंतर्गत, सर्वसाधारण जनतेस याद्वारे **सूचना** देण्यात येते की, माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठाद्वारे त्यांच्या आदेश दिनांक २५.१०.२०२४ (दि. २२.११.२०२४ रोजी प्राप्त) नुसार नियुक्त परिसमापकाद्वारे बनविण्यात आलेल्या परिसमापन संपत्तीचा भाग असलेल्या **"मे. एएमडब्ल्यू कमर्शियल व्हेईकल ॲप्लिकेशन्स लिमिटेड - परिसमापनामध्ये (कॉर्पोरेट ऋणको)"ची एकत्रितरित्या मालमत्तेची विक्री म्हणून** विक्रीकरिता ई-लिलाव प्रक्रियेच्या संबंधात इच्छुक बोलीदारांकडून बोली आमंत्रित करण्यात येत आहेत. लिलाव गुरुवार, दि. ६ नोव्हेंबर, २०२५ रोजी घेण्यात येईल. कॉर्पोरेट ऋणको त्यांच्या मूळ (होल्डींग) कंपनीकरिता ट्रक केबिन्सच्या उत्पादन आणि पुरवठा करण्यामध्ये गुंतलेला होता. सर्व संपत्ती भुज, गुजरात येथे आणि एक साचा पुणे येथे स्थित आहे.

मालमत्ता	राखीव किंमत	इसारा रक्कम अनामत	बोली विस्तार मूल्य
एकत्रितरित्या मालमत्तेची विक्री (ई-लिलाव दिनांक आणि वेळ दि. ०६.११.२०२५ रोजी दु. १२ - दु. २ वाजेपर्यंत)	रु. ८,००,००,०००/- (रुपये आठ कोटी मात्र)	रु. ८०,००,०००/- (रुपये ऐंशी लाख मात्र) (दि. ०३.११.२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी देय)	रु. २५,००,००० (रुपये पंचवीस लाख मात्र)

ई-लिलावाच्या महत्त्वाच्या अटी आणि शर्तीः

१. असे स्पष्ट करण्यात येते की, या आमंत्रणाचा हेतू इच्छुक बोलीदारांना आमंत्रित करणे हा आहे आणि विक्री करण्याकरिता परिसमापक किंवा कॉर्पोरेट ऋणकोकडून कोणत्याही प्रकारचे बंधन किंवा वचनबद्धता निर्माण करीत नाही. कोणतेही कारण न दर्शविता आणि कोणत्याही दायित्वाशिवाय प्रक्रिया रद्द करण्याचा किंवा त्यामध्ये बदल करण्याचा आणि/किंवा कोणत्याही बोलीदाराला स्वीकारण्याचा आणि/किंवा अपात्र ठरविण्याचा अधिकार परिसमापकास आहे. इच्छुक बोलीदारांनी लिलावात ठेवलेल्या वस्तुंबाबत स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी.

२. बोलीदारांनी "खरेदीदार नोंदणी" टॅब अंतर्गत नोंदणी करुन बँकनेटच्या ई-लिलाव पोर्टल https://baanknet.com/eauction-psb/bidder-registration वर पूर्व-पात्रता दस्तऐवज व त्यासह नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम २९ए अन्वये, लागू असलेल्या मर्यादेपर्यंत अपात्र नाहीत याची पुष्टी करणारे हमीपत्र सादर करावे. कोणत्याही टप्प्यावर जर बोलीदार अपात्र आढळल्यास, **ईएमडी जप्त करण्यात येईल.**

३. निर्दिष्ट वेळेनुसार विहीत ईएमडी जमा केली तरच बोली लावण्यास परवानगी देण्यात येईल.

४. विक्री पूर्ण करण्याकरिता यशस्वी बोलीदारास नोंदणी शुल्क आणि इतर लागू कर/प्रभार अतिरिक्त भरावे लागतील.

५. मालमत्तेची ई-लिलावाद्वारे एकत्रित विक्री **"जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे आहे", "तेथे जे आहे" आणि "कोणत्याही आधाराशिवाय" तत्त्वावर** काटेकोरपणे करण्यात येईल, कारण अशी विक्री कोणत्याही प्रकारच्या हमी आणि नुकसानभरपाईशिवाय मान्यताप्राप्त सेवा प्रदाता मे. पीएसबी अलायन्स द्वारे बँकनेट https://baanknet.com/ वर करण्यात येईल.

६. ई- लिलावाअंतर्गत वेळापत्रक खालीलप्रमाणे आहेः

बँकनेट पोर्टलवर पूर्व-पात्रता दस्तऐवज सादर करण्याचा अंतिम दिनांक	०३.११.२०२५
ईएमडी सादरीकरणाचा अंतिम दिनांक	०३.११.२०२५
पाहणीचा दिनांक आणि वेळ	दि. ०४.१०.२०२५ ते ०१.११.२०२५ स. ११.३० ते सायं. ०५.०० वाजेपर्यंत निम्नस्वाक्षरीकार यांना eoi.amwvehicle@gmail.com वर २ दिवस आधी सूचना पाठवावी.
ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ	दि. ०६.११.२०२५ (दु. १२.०० ते दु. २.००) (प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)
ई-लिलाव पोर्टल	https://baanknet.com/
लिलाव एजन्सीचा संपर्क व्यक्ती	बँकनेट - ईलिलाव पोर्टल (पीएसबी अलायन्स प्रायव्हेट लिमिटेड) ईमेल आयडीः support.baanknet@psballiance.com मोबा. क्र. +९१ ८२९१२ २०२२० (स. ९.०० ते सायं. ७.००)
परिसमापकाचे संपर्क तपशील	श्री. अविनाश ए. शुक्ला मोबा. क्र. ७३०३४ २३५००

७. निविदा दस्तऐवज आणि इतर तपशीलाच्या माहितीकरिता eoi.amwvehicle@gmail.com येथे तुमची विनंती ईमेल करावी.

सही/-
अविनाश अंबिकाप्रसाद शुक्ला, परिसमापक
एएमडब्ल्यू कमर्शियल व्हेईकल ॲप्लिकेशन्स लिमिटेड - परिसमापनामध्ये
आयबीबीआय नोंदणी क्र.: IBBI/IPA-003/IP-N00243/2019-2020/12839
एएफए प्रमाणपत्र क्र. AA3/12839/02/300626/301298 वैधता दि. ३०.०६.२०२६ पर्यंत
ईमेल आयडी (प्रक्रिया विशिष्ट): eoi.amwvehicle@gmail.com
ईमेल आयडी (आयबीबीआयकडे नोंदणीकृत): avinashshukla1708@gmail.com
परिसमापकाचा पत्ताः लेव्हल ३, पद्मा पॅलेस, प्लॉट क्र. ७९, सेक्टर २८, वाशी, नवी मुंबई, मुंबई-४००७०३.
पत्रव्यवहाराचा पत्ताः वॉटरफॉल इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रा. लि., १२२१, मेकर चेंबर V, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०००२१.

दिनांकः ०४.१०.२०२५,
ठिकाणः मुंबई

फॉर्म ए
जाहीर उद्घोषणा
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (ऐच्छिक परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१७ च्या विनियमन १४ अन्वये)

ऑईलटँकिंग इन्फ्रास्ट्रक्चर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता

	संबंधित तपशील	
१.	कॉर्पोरेट व्यक्तीचे नाव	ऑईलटँकिंग इन्फ्रास्ट्रक्चर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड
२.	कॉर्पोरेट व्यक्तीच्या स्थापनेचा दिनांक	२८.०९.२०१८
३.	प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट व्यक्तीची स्थापना/नोंदणीकरण झाले	कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय कंपनी निबंधक (आरओसी) मुंबई
४.	कॉर्पोरेट व्यक्तीचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक	U11200MH2018FTC314956
५.	कॉर्पोरेट व्यक्तीच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता	२०१-२०६, शिव स्मृति चेंबर्स, २रा मजला, ४९ए, डॉ. ए. बी. रोड, वरळी, मुंबई, मुंबई, महाराष्ट्र, भारत ४०००१८.
६.	कॉर्पोरेट व्यक्तीच्या संदर्भात परिसमापन सुरू होण्याचा दिनांक	०१.१०.२०२५
७.	परिसमापकाचे नाव, पत्ता, ईमेल पत्ता, दूरध्वनी क्रमांक आणि नोंदणी क्रमांक	कु. सुनिता उमेश आयपी नोंद क्र.: IBBI/IPA-001/IP-P00080/2017-18/10165 अभिहस्तांकनाकरिता प्राधिकृतता वैधः ३१.१२.२०२५ पत्ताः मे. यूसीसी ॲण्ड असोसिएट्स एलएलपी, चार्टर्ड अकाऊंटन्टस, १३१५, अंसल टॉवर, ३८ नेहरू प्लेस, नवी दिल्ली, दिल्ली, ११००१९. दूर.: ९८१०२६६७०२ ईमेलः sunita.umesh@uccglobal.in ईमेलः vlgoiltankinginfra@gmail.com
८.	दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक	३१.१०.२०२५

याद्वारे सूचना देण्यात येते की, **ऑईलटँकिंग इन्फ्रास्ट्रक्चर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडने दि. ०१.१०.२०२५** रोजी ऐच्छिक परिसमापन प्रक्रिया सुरू केली आहे.

ऑईलटँकिंग इन्फ्रास्ट्रक्चर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांना याद्वारे त्यांच्या दाव्यांचे पुरावे **३१.१०.२०२५** रोजी किंवा त्यापूर्वी परिसमापक यांच्याकडे नोंद क्र. ७ मध्ये नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.

वित्तीय कर्जदार यांनी दाव्याबाबतचे त्यांचे दाव्यांचे पुरावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व भागधारक त्यांचे दाव्यांचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.

दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

दिनांकः ०४ ऑक्टोबर, २०२५ **सही/-**
ठिकाणः मुंबई **सुनिता उमेश**
ऑईलटँकिंग इन्फ्रास्ट्रक्चर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडच्या परिसमापक
आयपी नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP-P00080/2017-18/10165
एएफएः ३१.१२.२०२५

मध्य रेल्वे

पुरवठा, स्थापना, चाचणी कार्यान्वयन

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (एसॲण्डटी), १ला मजला, पार्सल कार्यालय इमारत, पी.एफ.क्र. १३ जवळ, मध्य रेल्वे, मुंबई सीएसएमटी ४००००१ भारताच्या राष्ट्रपतींकरिता आणि त्यांच्या वतीने नामांकित कंत्राटदारांकडून **ई-निविदा** (खुली निविदा) आमंत्रित करीत आहेत. **निविदेच्या सादरीकरणा